क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१३२

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
**प्रशासन विभाग**

दिनांक : ०१ एप्रिल, २०१३.

दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३२व्या बैठकीचे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर केले आहे.

२. बैठकीची कार्यसूची संदर्भासाठी सोबत ठेवली आहे.

(प्र.सि.तायडे) १/४/२०१३
सचिव,
कार्यकारी समिती

सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)/
उप-महानगर आयुक्त (प्रशासन) 9/4

अति.महानगर आयुक्त (२) 1.4.13

अति.महानगर आयुक्त /प्रकल्प संचालक 4/4/13

महानगर आयुक्त 10/4/13.

मा.मुख्यमंत्री व
अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

महानगर आयुक्त
DMC(4)

23/4/13.

मु.मं.स. प्राप्त झाले
दि. २०/४/१३.

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३२व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २३ मार्च, २०१३ (शनिवार) |
| वेळ | : | सकाळी १०.०० वाजता |
| सभास्थान | : | सहयाद्री राज्य अतिथीगृह,<br>बी.जी.खेर मार्ग,<br>मलबार हिल,<br>मुंबई - ४०० ००६. |

उपस्थित सदस्य :

| | |
|---|---|
| श्री.पृथ्वीराज चव्हाण<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. सुनिल वामन प्रभू<br>मुंबईचे महापौर | सदस्य |
| श्री.नवाब मलिक<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री.प्रशांत रामशेठ ठाकूर<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. प्रकाश बिनसाळे<br>विधान परिषद सदस्य | सदस्य |
| श्री. राहुल रमेश शेवाळे<br>अध्यक्ष, स्थायी समिती | सदस्य |
| श्री. जयन्त कुमार बाँठीया<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

श्री. सिताराम कुंटे
महापालिका आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका — सदस्य

श्री. संजय भाटिया
व्यवस्थापकीय संचालक,
सिडको — सदस्य

श्री.यु.पी.एस. मदान
महानगर आयुक्त — सदस्य-सचिव

निमंत्रित :

श्रीमती प्रतिभा पाटील
महापौर,
भिंवडी-निजामपूर महानगरपालिका

श्रीमती सारिका गायकवाड
अध्यक्षा,
ठाणे जिल्हा परिषद

श्रीमती कविता गायकवाड
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्री. गणेश शिंदे
नगराध्यक्ष,
उरण नगरपरिषद

श्रीमती नमिता नाईक
नगराध्यक्षा,
अलिबाग नगरपरिषद

श्री. अजय सावंत
नगराध्यक्ष,
माथेरान नगरपरिषद

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प)(अतिरिक्त कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन

श्री. बिपीन श्रीमाळी
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, प्राधिकरणाने श्री. रा.ता.कदम, माजी महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०१२ रोजी झालेल्या दुःखद निधनाबद्दल शोक व्यक्त केला व सदस्यांनी एक मिनिट स्तब्ध उभे राहून त्यांना श्रध्दांजली वाहिली. त्यानंतर प्राधिकरणाने श्री. रा.ता.कदम यांच्या निधनाबद्दलच्या शोक ठरावास (जोडपत्र-१) मंजूरी दिली. या ठरावाची प्रत त्यांच्या कुटुंबियांना पाठवून प्राधिकरण त्यांच्या दुःखात सहभागी असल्याचे कळवावे असे निर्देश मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी महानगर आयुक्तांना दिले.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी श्री.संजय भाटीया, व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांचे प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत केले.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी श्री. तानाजी सत्रे, माजी व्यवस्थापकीय संचालक (अति.कार्यभार), सिडको यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी श्री. यु.पी.एस. मदान, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे प्राधिकरणाचे 'सदस्य-सचिव' म्हणून स्वागत केले. तसेच श्री. राहुल अस्थाना, माजी महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचे

'सदस्य-सचिव' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही गौरवपूर्ण उल्लेख केला व त्यानुसार ठराव मंजूर केला. (जोडपत्र-२)

त्यानंतर विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३१व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ बैठकीचे कार्यवृत्त कायम करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी त्यांच्या दिनांक ०४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रान्वये बाब क्र.१४ म्हणजे "मुंबई पारबंदर प्रकल्प (शिवडी ते न्हावा) या प्रकल्पाच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत" च्या चर्चेच्या दरम्यान खालील वाक्य अंतर्भूत करावयाचे राहून गेले असल्याने कार्यवृत्ताच्या परिच्छेद क्र.३ च्या शेवटी अंतर्भूत करण्यास मंजूरी दयावी :

> "तसेच प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी कारंजा-रेवस हा पूल मुंबई पारबंदर प्रकल्प यावरील वाहतूकीच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असल्याची बाब निदर्शनास आणून दिली. मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी त्यास संमती दर्शविली."

१.२ तसेच सदर पत्रामध्ये प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी सुचविल्यानुसार मा.अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेल्या विषयांतर्गत परिच्छेद क्र.२ म्हणून खालील परिच्छेद अंतर्भूत करण्यास मान्यता दयावी :

> "२. प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी माथेरान हे प्राधिकरणाच्या अंतर्गत येणारे एकमेव थंड हवेचे ठिकाण असून त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे असे मत प्रदर्शित केले."

१.३ वरील सुधारणांसह कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३१व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ कार्यवृत्त अहवालावर चर्चा करताना खालील बाबींवर चर्चा करण्यात आली.

बाब क्र.९ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २०११-१२चा वार्षिक अहवाल.

या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी असे मत प्रदर्शित केले की, वार्षिक अहवालाची संगणकीय तबकडी (C.D.) सर्व सदस्यांना पुरविण्यात याव्यात.

यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अधिनियमातील तरतुदींनुसार वार्षिक अहवाल दोन्ही विधीमंडळाच्या पटलावर सादर करावयाचा असतो. जे सदस्य वार्षिक अहवालाची संगणकीय तबकडी (C.D.) ची मागणी करतील त्यांस ती उपलब्ध करुन देण्यात येईल.

पटल बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर केलेले तसेच अर्थसंकल्पात तरतूद असलेल्या परंतु नंतर रद्द केलेल्या प्रकल्पांची माहिती.

या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने यापूर्वी मंजूर केलेल्या विविध प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे प्रस्ताव महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाची पूर्व मंजूरी प्राप्त केल्याशिवाय परस्पर रद्द करण्यात येऊ नयेत. प्राधिकरणाने मंजूर केलेले प्रस्ताव रद्द करावयाचे असल्यास ते प्राधिकरणासमोर समर्थनासह सादर करण्यात यावेत जेणेकरुन त्या प्रकल्पांचे प्रस्ताव प्राधिकरणास रद्द करण्याचा निर्णय घेणे शक्य होईल.

२.२ त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

## बाब क्र.३ : प्राधिकरणाचे सन २०१३-१४ वर्षाचे वार्षिक कार्ये-कार्यक्रम.

३.१ महानगर आयुक्तांनी सन २०१३-१४ च्या वार्षिक कार्यक्रमाबाबत सविस्तर माहिती सांगितली. तसेच या आर्थिक वर्षात एकूण ६५ महत्वपूर्ण योजना/प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यांचीही थोडक्यात माहिती सांगितली.

३.२ यानंतर बाब टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्राधिकरणाने सादर केलेल्या वार्षिक कार्यक्रमांना मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२९३ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** (अ) टिप्पणीसह सादर केलेल्या २०१३-२०१४ सालचा वार्षिक कार्ये कार्यक्रम व २०१३-१४ सालचा मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीचा वार्षिक कार्यक्रम आणि महानगर योजना - फिरता निधीचा (मेगासिटी योजना) वार्षिक कार्यक्रम संमत करण्यात येत आहे. (ब) बाब टिप्पणीतील वार्षिक कार्ये कार्यक्रमात अंतर्भूत केलेल्या योजनांच्या तपशिलाला मान्यता देण्यास कार्यकारी समितीला याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

## बाब क्र.४ : प्राधिकरणाचे सन २०१३-२०१४ सालचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक.

४.१ महानगर आयुक्तांनी प्राधिकरणाचा सन २०१३-१४ चा अर्थसंकल्प सादर केला. प्राधिकरणाचे सन २०१२-२०१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१३-२०१४ चे वार्षिक अंदाजपत्रकाविषयी महत्वाच्या बाबींबाबत माहिती दिली.

४.२ सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता जमेचा अंदाज हा रु.३,९१६.९० कोटी एवढा असून खर्चाचा अंदाज हा रु.४,०२८.५७ कोटी असा आहे. जमेच्या बाजूमध्ये जमीन विक्रीपासून रु. १,३३९.७३ कोटी व ठेवी, व्याज, अंशदान व स्कायवॉक वरील जाहिराती इत्यादींच्या माध्यमातून रु.१,८९७.१७ कोटी अपेक्षित असून उर्वरीत रक्कम केंद्र/राज्य शासनाकडील अंशदान इत्यादी मार्फत अपेक्षित आहे.

..७/-

४.३ सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात आलेल्या योजनांमधील प्रमुख योजना पुढीलप्रमाणे आहेत. मोनोरेलसाठी रु.६००.०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रादेशिक जलस्त्रोताच्या विकासाकरिता रु.२०.०० कोटी, मेट्रोसाठी सुमारे रु.६०८.०० कोटी रुपयांची तरतूद, स्कायवॉकसाठी रु.४९.०० कोटी रुपयांची तरतूद, मुंबई पारबंदर छन्नमार्ग (MTHL) शिवडी ते न्हावाशेवा जलसेतू रु.२००.०० कोटी, पुनर्वसाहत कॉलनीमध्ये पायाभूत सुविधांकरिता रु.८९.५० कोटी रुपयांची तरतूद, विरार - अलिबाग बहुउद्देशिय छन्नमार्गाच्या विकासाकरिता रु.५०.०० कोटी, भाडे तत्वावर निवासस्थाने बांधणे रु.२०.०० कोटी, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प व विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प यावर ७८८.०० कोटी, वडाळा ट्रक टर्मिनलकरिता रु.८५.०० कोटी, एम एम आर निर्मल अभियान रु.१०.०० कोटी, मिठी नदी विकास व वांद्रे-कुर्ला संकुलात नागरी सुविधा यावर अनुक्रमे रु.२०.०० व रु.८०.०० कोटी तसेच घनकचरा व्यवस्थापन रु.२५.०० कोटी, ध्वनी प्रदुषण भिंतीचे बांधकाम यावर रु.३५.०० कोटी, वांद्रे-कुर्ला संकुल ते पुर्व द्रुतगती जोडरस्ता यावर रु.५०.०० कोटी, ऐरोली-कटाईनाका महामार्गाचा विकास रु.२५.०० कोटी व इतर संकीर्ण प्रकल्पावर रु.६५.१५ कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

४.४ मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचविले कि, प्राथम्यता क्रम ठरवून कामे घेण्यात यावीत. अर्थसंकल्पावर चर्चा करताना प्राधिकरणाच्या सदस्या श्रीमती नमिता नाईक, नगराध्यक्षा, अलिबाग नगरपरिषद यांनी असे नमुद केले की, नगरपरिषद अतिशय लहान असल्याने त्यांचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी आहेत. तरी प्राधिकरणाने विशेष लक्ष देऊन अलिबाग नगरपरिषदेस पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

४.५ यावर चर्चा करताना अति. महानगर आयुक्त (१) यांनी असे निदर्शनास आणून दिले कि, प्राधिकरण विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प अंतर्गत कल्याण शहर रोड, शिरगांव फाटा ते बदलापूर जोडणारा रस्ता, रेवस-कारंजा रस्त्यावर खाडी पूल,

खोपोली शहर वळण रस्ता, भिवंडी शहर वळण रस्ता, नेरळ-माथेरान इ. कामे हाती घेण्यात आलेली आहेत. यावरुन असे दिसून येईल कि, प्राधिकरण महानगरपालिका/नगरपरिषद क्षेत्राजवळील महत्वाच्या रस्त्यांचे काम हाती घेऊन एक प्रकारे मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगिण विकास करीत आहे. तसेच शहर स्तरावरील व अंतर्गत कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घ्यावयाचे असल्यास, एक धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल.

४.६ प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी अशी सुचना केली कि, अलिबाग व सभोवतालच्या क्षेत्रात फार मोठया प्रमाणात पर्यटक येतात त्यामुळे ते क्षेत्र विकसित करण्याची गरज आहे. त्याकरीता प्राधिकरणाने सदर क्षेत्राचा विकास करावा. अलिबाग हे पर्यटकांचे स्थान असल्यामुळे तेथे घनकचरा निर्मुलनाची योजना राबविण्याचा विचार करण्यात यावा. यावर महानगर आयुक्त यांनी विस्तारीत मुंबई पायाभूत सुविधा प्रकल्प हा मुंबई वगळता मुंबई महानगर क्षेत्राच्या विकासाकरिता आहे. तसेच अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या चर्चेमध्ये भाग घेताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी पायाभूत सुविधांच्या कामाकरिता प्राधिकरणाने अनुदान उपलब्ध करुन द्यावे अशी मागणी केली. प्राधिकरणाचे सदस्य श्री. राहुल शेवाळे, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी चर्चेच्या दरम्यान असे सूचविले आहे कि, जे.एन.एन.यु.आर.एम. मधील ३५% रक्कमेची जबाबदारी जी महानगरपालिकेवर लादण्यात आलेली आहे ती जबाबदारी प्राधिकरणाने उचलावी.

४.७ वरील संदर्भात प्राधिकरणाचे सदस्य श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सुचविले कि, मुंबई महानगर क्षेत्रातील नगरपालिकांच्या हद्दीतील पायाभूत विकासाची कामे करण्याकरिता जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनर्निर्माण अभियान (JNNURM) च्या धर्तीवर निधीची उभारणी करण्याची योजना तयार करता येईल, ज्यामधून नगरपालिकांना निधी पुरविता येईल. हा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणात स्थापित करता येईल. यावर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी याबद्दल योग्य अभ्यास करुन तशी योजना प्रस्तावित करण्याकरिता सूचना केली.

४.८ त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीसह प्रस्तावित केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकावर विचार करुन मान्यता दिली व पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १२९४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३ (१) अन्वये प्राधिकरणाचा अंदाजित जमा व खर्च दर्शविणारा २०१३-२०१४ सालचा अर्थसंकल्प आणि २०१२-२०१३ सालचे सुधारीत अंदाजपत्रक मंजूर करण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण याव्दारे मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधी आणि महानगर योजना-फिरता निधी अंदाजित जमा व खर्च दर्शविणारे सन २०१३-१४ चे अर्थसंकल्पीय अंदाज व सन २०१२-१३ चे सुधारीत अंदाज यांस मंजूरी देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पामध्ये व बाब टिप्पणीत नमूद केलेल्या परिवहन प्रकल्पांवरील सर्वेक्षणे, अभ्यास व प्रकल्पांवर अर्थसंकल्पात नमूद केलेल्या तरतूदींप्रमाणे आवश्यक ती रक्कम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन यांच्याकडे हस्तांतरीत करण्यास प्राधिकरण याव्दारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.५ : प्राधिकरणाचे अशासकीय सदस्य/निमंत्रित यांना बैठक उपस्थितीसाठी बैठक शुल्क.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) विनियम, १९७९ च्या नियम ३ (१) मध्ये प्राधिकरणाच्या अशासकीय सदस्यांना महानगर प्राधिकरणाच्या किंवा तिच्या कोणत्याही समितीच्या किंवा उप-समितीच्या बैठकीस उपस्थित रहाण्याबद्दल बैठक शुल्क म्हणून

प्रतिदिन रु. ३००/- मिळण्याची तरतूद आहे. महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने दिनांक १३ मार्च, २०१२ रोजीच्या शासन निर्णय क्र.शासाऊ-१०.१०/प्रक्र.९६/१०/सा.उ. अन्वये राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या संचालक मंडळाच्या सदस्यांना बैठकींना उपस्थित रहाण्याबद्दल मिळणा-या बैठक शुल्कामध्ये सुधारणा करुन ते शासन निर्णयाच्या तारखेपासून प्रत्येक बैठकीला रु. ५००/- इतके केले आहे.

५.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाने दिनांक १३ सप्टेंबर, २००५ रोजी झालेल्या ११४व्या बैठकीतील ठराव क्र.१०५७ व दिनांक ०९ फेब्रुवारी, २०१० रोजी झालेल्या १२६व्या बैठकीतील सुधारीत ठराव क्र.१२२८ नुसार रोटेशन पध्दतीने मुंबई महानगर प्रदेशातील महापौर, नगराध्यक्ष, जिल्हापरिषद अध्यक्ष यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्राधिकरण ठरविल व शासन मान्य करेल त्या रक्कमेने अशासकीय सदस्य/निमंत्रित यांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) विनिमय, १९७९ च्या नियम ४ मध्ये "तसेच स्थायी निमंत्रितांना बैठक शुल्क सुध्दा मिळेल" अशी ओळ घालण्यास मान्यता मिळावी. यास्तव प्राधिकरणामध्ये देखील सदर बैठक शुल्काचे अशासकीय सदस्य/निमंत्रित यांना राज्य शासनाच्या मान्यतेसापेक्ष प्रती बैठकीस रु. ३००/- वरुन रु. ५००/- इतके वाढविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) विनिमय, १९७९ च्या नियम ३(१) मध्ये दुरुस्ती करण्याचा आता प्रस्ताव आहे व त्यास मंजूरी देण्याची विनंती आहे.

५.३ चर्चेच्या दरम्यान अशासकीय सदस्यांनी बैठक शुल्काची व प्रवास भत्याची मिळणारी रक्कम अत्यल्प असल्याचे नमूद केले व सदर बैठक शुल्क किमान रु.१,०००/- करावे अशी मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली. तसेच प्रवास भत्यात प्रती कि.मी. वाढ करावी अशीही विनंती केली. सदर विनंतीस मान्यता देताना मा. मुख्यमंत्री यांनी शासनाचे मुख्य सचिव यांना सदर प्रकरणी लक्ष घालून बैठक शुल्कात/प्रवास भत्त्यात योग्य ती वाढ करण्याबाबत विचार करण्यास निर्देश दिले.

..११/-

५.४ त्यानंतर बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२९५ :

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० सोबत उक्त अधिनियमाच्या कलम ४ चे उप-कलम (५) खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण बाब टिप्पणीच्या जोडपत्र-४ मध्ये प्रस्तावित केल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) (दुरुस्ती) विनिमय, २०१३ (जोडपत्र-३) मध्ये आणि तिला राज्य शासनाची मान्यता मिळेल या गृहतिकाच्या अधिन राहून याव्दारे मान्यता देत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे, की, प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनाला विनंती करण्याकरिता महानगर आयुक्तांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनिमय १९७५ - किमान अनुज्ञेय रक्कमेच्या मर्यादेत वाढ.**

६.१ महानगर आयुक्त यांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचा-यांना व त्याच्यावर अवलंबून असणा-या कुटुंबियांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम, १९७५ मधील नियम (४) मधील तरतुदी नुसार त्यांना वैद्यकीय कारणास्तव केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात येते. त्याकरीता सद्य:स्थितीत रक्कमेची एक महिन्याच्या ५०% पगाराएवढी रक्कम वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी अदा करण्यात येते. त्यांनी असेही स्पष्ट केले की, या विनियमामध्ये १९८३ पासून काहीही बदल झालेला नाही. वैद्यकीय शुल्कामध्ये भरमसाठ वाढ झालेली

असून महागाईमुळे ही रक्कम अपूरी वाटते. त्यामुळे या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या रक्कमेमध्ये वाढ करणे आवश्यक असल्यामुळे १००% वाढ करण्याचे प्रस्तावित केले आहे. प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना गंभीर आजार झाल्यास कोणती तरतूद करण्यात आली आहे. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्त नमूद अनुज्ञेय रक्कमेपेक्षा जास्तीची रक्कम प्रत्येक प्रकरणामधील गुणवत्तेनुसार सक्षम अधिकारी त्यांना असलेल्या विशेष अधिकाराचा वापर करुन अतिरिक्त रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करतात.

६.२ त्यानंतर प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य आणि श्री. नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे सूचविले की, विशेषतः वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकासोबत कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना गटविमा वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू करावी. तथापि, याबाबत असे सूचित करण्यात आले की, प्राधिकरणामध्ये गटविमा योजना ही सन १९८७ सालापासून सुरु असून अधिकारी/कर्मचा-यांच्या पगारातून एक ठराविक रक्कम कापण्यात येत आहे. त्यामुळे अधिकारी/कर्मचा-यांच्या कुटुंबियांसाठी आजीवन गटविमा वैद्यकीय योजना लागू करण्यात यावी.

६.३ त्यावर मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष प्राधिकरण यांनी असे निर्देश दिले की, प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अवलंबून असणा-यांना आजीवन गट वैद्यकीय विमा योजनेसारखी दुसरी चांगली योजना प्राधिकरणासमोर सादर करावी. तत्पूर्वी सादर केलेल्या प्रस्तावानुसार कार्यवाही करावी असे सूचविले.

६.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. : १२९६</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७५ चे कलम ५० व त्यासोबत या अधिनियमाच्या कलम ११ च्या

उपकलम (२) नुसार हे प्राधिकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम, १९७५ मध्ये बाब टिप्पणीच्या जोडपत्र-२ मध्ये दर्शविल्याप्रमाणे व प्रस्तावित केल्याप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देत आहे (जोडपत्र-४)."

**बाब क्र.७ : वडाळा भारवाहक तळ येथील सुविधा इमारतीत अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांना राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासाठी भाडेतत्वावर तात्पुरत्या स्वरुपावर दिलेल्या जागेचे भाडे नाममात्र दराने करणेबाबत.**
**दिनांक ०५ नोव्हेंबर, २००७ ते दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ पर्यंत.**

७.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीतील प्रस्तावाबाबतची माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाने १० सप्टेंबर, २००८ रोजी झालेल्या १२२ व्या बैठकीतील ठराव क्र.११६८ अन्वये सुविधा इमारतीत ८८६.८० चौ. मी. परिबध्द क्षेत्र (Built up area) अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांना अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासाठी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने निश्चित केलेल्या दराने तात्पुरत्या स्वरुपावर अनुज्ञप्ती तत्वावर ३ वर्षासाठी किंवा त्यांच्या सांताक्रूझ येथील स्वतःच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत यामध्ये जे अगोदर असेल त्या कालावधीसाठी दिले आहे. अग्निशमन प्रशिक्षण केंद्र यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ रोजी त्यांना दिलेल्या जागेचा ताबा परत केला आहे.

७.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, संचालक, राज्य अग्निशमन सेवा यांनी दिनांक २६ एप्रिल, २०१२ रोजीच्या पत्राव्दारे असे कळविले की, अग्निशमन सेवा ही सार्वजनिक सेवा आहे. या सेवेत काहीही उत्पन्न (Income) नाही. या परिस्थितीत प्राधिकरणाने आकारलेल्या सध्याच्या भाडयाचा दर म्हणजे कार्यालयीन जागेसाठी परिबध्द क्षेत्राच्या प्रती चौ. मी. दरमहा रु.१७७/- आणि निवासी जागेसाठी (डॉमिटरीसह) प्रती चौ.मी. दरमहा रु.५९/- खूपच जास्त आहे. त्यांनी विनंती केली आहे की, पोलीस विभाग व पोस्ट

ऑफिस प्रमाणे त्यांनाही दरमहा रु.१/- प्रती चौ.मी. याप्रमाणे सवलतीचा भाडयाचा दर आकारण्यात यावा.

७.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, वडाळा भारवाहक तळ येथे अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांना रु.१/- प्रमाणे नाममात्र भाडे आकारण्यात यावे मात्र त्या संस्थानी विद्युत देयके, पाणी पट्टी, महापालिका कर, सेवा व देखभाल इत्यादी खर्च स्वतः करावा असा प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर करण्यात आला आहे.

७.४ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२९७ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या दिनांक १० सप्टेंबर, २००८ रोजीचा ठराव क्र.११६८ मध्ये अंशतः बदल करुन तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ३ चे उप-कलम (२) मधील अधिकारांचा व या बाबतीत लागू होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.७ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, वडाळा भारवाहक तळ येथील सुविधा इमारतीमधील राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्रासाठी वाटप केलेल्या संपूर्ण जागेसाठी पूर्वलक्षी प्रभावाने ताबा दिलेल्या तारखेपासून ते ताबा परत केल्यापर्यंत म्हणजे दिनांक २७ सप्टेंबर, २०१२ पर्यंत नाममात्र रु.१/- प्रति चौ.मी. दरमहा असा दर आकारण्यास मंजूरी देत आहे. या व्यतिरिक्त मालमत्ता व लागू असलेले इतर कर व देखभालीचा खर्च वेगळेपणाने प्रचलित दरानुसार वसूल करण्यात यावे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

..१५/-

**<u>बाब क्र.८ :</u>** **<u>मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तुंच्या बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ (१९८३चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२) च्या कलम ९ (१) (एल) अन्वये मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोलीचे सदस्य नामनिर्देशित करणे.</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोल्लेखित अधिनियमाच्या कलम ९(१) (एल) अन्वये महानगर आयुक्तांना वगळून प्राधिकरणातर्फे एका प्रतिनिधीची नेमणूक बाजार समितीवर सदस्य म्हणून करावयाची आहे. सध्या प्राधिकरणाचे पणन व्यवस्थापक, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोलीचे नामनिर्देशित सदस्य आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती यांनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, बाजार आवार ३०२ हेक्टर क्षेत्रात पसरलेले आहे. यामध्ये पुष्कळ अडी अडचणी आहेत. बाजार आवारात मुलभूत सोयीसुविधा नाहीत. या अडी अडचणी सोडविण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे अति. महानगर आयुक्त यांना नामनिर्देशित करावे अशी विनंती केली आहे.

८.२ मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तुच्या बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ च्या कलम ९ (१) (एल) अन्वये उप-महानगर आयुक्त (भूमी व मिळकती), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोलीचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करण्यात यावे असा प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर करण्यात आलेला आहे.

८.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १२९८ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट वस्तुंच्या बाजारपेठा (स्थल नियमन) अधिनियम, १९८३ च्या कलम ९ (१) (एल) अन्वये प्रदान

केलेल्या शक्तींचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे उप-महानगर आयुक्त (भूमी व मिळकती), मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांना मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोलीचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की**, या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

**बाब क्र.९ : माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या वडाळा मधील सी.एस.क्र.८ (पै) [जुना सी.एस.क्र.६ (पै) आणि ९ (पै)] च्या भूखंडावर २.५० वरुन ४.०० इतका चटई क्षेत्र निर्देशांक मिळणेबाबत.**

९.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासनाने त्यांच्या दिनांक १० ऑगस्ट, २०११ रोजीच्या अधिसूचनेद्वारे सी.एस.क्र.८(पै) [जुना सी.एस.क्र. ६(पै) आणि ९(पै)], आणिक-वडाळा येथील माथाडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेचा ६५,००० चौ.मी. क्षेत्रफळाचा पूर्वी वगळलेला भूखंड मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वडाळा भारवाहक तळाच्या अधिसूचित क्षेत्रामध्ये पुन्हा समाविष्ट केला आहे. शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांच्या दिनांक १५ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या पत्राद्वारे वडाळा भारवाहक तळाच्या अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट केलेल्या भूखंडासंदर्भात चटई क्षेत्र निर्देशांक १.३३ वरुन २.५० इतके अधिमूल्य आकारुन अनुज्ञेय करण्याच्या निर्णयाबाबत कळवून त्याप्रमाणे या भूखंडासाठी कलम ४०(११५) नुसार विकास नियोजन प्रस्ताव तयार करुन तो प्राधिकरणाने शासनास मंजूरीसाठी सादर करण्याचे आदेश दिले होते.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, शासनाच्या वरील आदेशानुसार विषयांकित भूखंडाचा प्रारुप नियोजन प्रस्ताव तयार करुन प्राधिकरणाच्या दिनांक ६ मार्च, २०१२ रोजी झालेल्या १३०व्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास प्राधिकरणाने ठराव क्र. १२८० अन्वये मान्यता दिली होती. प्राधिकरणाच्या मान्यतेनंतर

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन प्रारुप नियोजन प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी दिनांक ७ सप्टेंबर, २०१२ रोजी सादर केला आहे. सदर प्रस्तावास शासनाची मंजुरी येणे बाकी आहे.

९.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, शासनाच्या नगर विकास विभागाने त्यांच्या दिनांक ६ नोव्हेंबर, २०१२ रोजीच्या पत्रान्वये विषयांकित भूखंडावर ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक मिळणेबाबत प्राधिकरणाच्या बैठकीपुढे प्रस्ताव सादर करुन पुढील कार्यवाही करण्यास कळविले. शासनाच्या या पत्राच्या अनुषंगाने प्रारुप प्रस्ताव तयार करुन तो प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

९.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, विषयांकित भूखंडावर ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक वाढविण्यापूर्वी वडाळा भारवाहक तळाच्या अधिसुचित क्षेत्राच्या मुलभूत पायाभूत सुविधांचा अभ्यास करावा लागेल. तसेच प्राधिकरणाचे सदस्य श्री. सिताराम कुंटे, महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सुचविले की, वडाळा भारवाहक तळाच्या अधिसुचित क्षेत्राच्या बाहेरील आजुबाजुच्या परिसरात चटई क्षेत्र निर्देशांक १.३३ अनुज्ञेय असून विषयांकित भुखंडावर ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केल्यास महानगर पालिकेच्या मूलभूत पायाभूत सुविधेवर ताण पडेल. हा ताण कमी करण्यासाठी मूलभूत पायाभूत सुविधांचा एकत्रितरित्या अभ्यास करावा लागेल.

या विषयाबाबत मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे आदेश दिले की, शासनाच्या विविध गृह बांधणी योजनांच्या धोरणांचा (Govt. Housing Scheme Policy) अभ्यास करुन त्या अनुषंगाने सुधारीत प्रस्ताव प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत सादर करावा.

**<u>बाब क्र.१०</u> : <u>कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत (MURM) मंजूर झालेल्या "रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण" या प्रकल्पासाठी कर्ज सहाय्य देणे.</u>**

१०.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने महापालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत असलेल्या नागरी

मूलभूत सुविधांचा तुटवडा व भविष्यात त्या सुविधा पुरविण्याची वाढीव गरज लक्षात घेता तसेच लोकसंख्येत होणारी वाढ नजरेत ठेवून, महापालिकेने सन २००७ पासून मल:निसारण, पाणी पुरवठा, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था, घनकचरा व्यवस्थापन आणि रस्त्यांचा विकास या सारखे मोठे प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांपैकी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने ९ प्रस्ताव केंद्र पुरस्कृत जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजुरीसाठी सादर केले होते. यापैकी जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर झालेले पाणी पुरवठा, मल:निसारण, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था अशा रु. ५८५.४७ कोटीच्या ४ प्रस्तावांना महानगरपालिकेचा ५०% हिस्सा म्हणजे रु.२९२.७३ कोटी एवढया कर्ज रक्कमेस प्राधिकरणाने दिनांक ०३ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीत मंजुरी दिली आहे. यापैकी रु.२२९.३९ कोटी एवढा निधी दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ पर्यंत वितरित करण्यात आला आहे.

१०.२ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, याव्यतिरिक्त कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रु.३३८.५१ कोटी खर्चाचे रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण हा प्रकल्प हाती घेतला आहे. महाराष्ट्र शासनाने जेएनएनयुआरएमच्या धर्तीवर आखणी केलेल्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" या योजनेमध्ये महाराष्ट्र शासनामार्फत नागरी मूलभूत सुविधांसाठी असलेले प्रकल्प मंजूर करुन महानगरपालिकांना प्रकल्प राबविण्याकरिता ५०% अर्थसहाय्य अनुदान स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात येते. या योजनेअंतर्गत मुंबई महानगर प्रदेशातील कल्याण-डोंबिवली, मिरा-भाईंदर व भिवंडी-निजामपूर या शहरांसाठी काही प्रकल्प सदर योजनेअंतर्गत मंजूर झाले असून त्यानुसार शासनामार्फत अंशत: अनुदानाचे वितरण करण्यात आले आहे.

१०.३ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा रु.३३८.५१ कोटीच्या रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण हा प्रकल्प "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" अंतर्गत मंजूर झाला असून त्यासाठी वितरित करण्यात येणा-या रु. १६९.२६ कोटी अनुदानापैकी रु. ८१.२१ कोटी एवढी अुनदान रक्कम शासनामार्फत वितरित करण्यात आली आहे. महानगरपालिकेने आपला

हिस्सा म्हणून रु. १६९.२६ कोटी (एकूण खर्चाच्या ५०%) कर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. सदर प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून रु. १६.६९ कोटी एवढी रक्कम खर्च झालेली आहे.

१०.४ त्यापुढे, महानगर आयुक्त यांनी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वित्तीय स्थितीबाबत असे नमूद केले की, सदर कर्ज प्रस्तावासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे वित्तीय स्थितीचे विश्लेषण (Appraisal) महानगरपालिकेने विनंती केल्याप्रमाणे रु. १६९.२६ कोटी (एकूण खर्चाच्या ५०%) कर्ज रक्कम गृहीत धरुन करण्यात आले आहे. सदर प्रकल्प हा अ-वाणिज्यीक स्वरुपाचा असल्यामुळे व्याजदर १०% द.सा.द.शे. व कर्ज परतफेड कालावधी १५ वर्ष (कुठल्याही मोरॅटोरियम शिवाय) या प्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून (MMRD Fund) देण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्तावाची पडताळणी करतेवेळी पारंपारिक पध्दतीने करण्यात येणा-या जमा व खर्चाच्या प्रक्षेपणाव्यतिरिक्त काही महत्वाच्या बाबी जसे जकात कर ऐवजी सन २०१२ पासून लागू असलेल्या स्थानिक संस्था कर (LBT), १% मुंद्राक शुल्क (Stamp Duty) व पारगमण शुल्क (Escort Fee) इत्यादी महसूली स्त्रोताची वसूली समाधानकारक असल्याचेही विचारात घेण्यात आल्याचे महानगर आयुक्त यांनी स्पष्ट केले.

१०.५ महानगर आयुक्त यांनी सदर कर्ज प्रस्तावाबाबत असेही स्पष्ट केले की, मुल्यांकन अहवालावरुन असे दिसते की, महानगरपालिकेला रु.१६९.२६ कोटीचे कर्ज कोणत्याही विशेष अटींशिवाय (जसे मोरॅटोरियम, भांडवली खर्चावरील बंधने) देता येणे शक्य असल्याचे तसेच महानगरपालिका प्राधिकरणाच्या रु.१६९.२६ कोटी एवढया कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे. तसेच महानगरपालिकेची गुणोत्तर उपयोगिता (Operating Ratio) (महसुली जमा ÷ महसुली खर्च) वर्ष २०१२-१३ ते वर्ष २०२६-२७ या कालावधीत ०.९३ पेक्षा कमी आहे तर ऋण गुणोत्तर सेवाव्याप्ती (Debt Servicing Coverage Ratio) (निव्वळ महसूली जमा ÷ कर्ज परत फेड) सतत १.६६ पेक्षा जास्त असल्याचे आढळते असेही स्पष्ट केले.

..२०/-

१०.६ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असेही स्पष्ट केले की, महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित वित्तीय धोरणानुसार शासनाद्वारे कर्ज उभारण्यासाठी परवानगी देताना कर्ज परतफेडीची संपूर्ण जबाबदारी संबंधित कर्जदार संस्थेची असते. त्यामुळे प्राधिकरणामार्फत कर्ज उपलब्ध करुन देताना नेहमीच्या अटींव्यतिरिक्त प्राधिकरणाच्या कर्ज परतफेडीच्या हमीसाठी कर्जदार संस्थेने बँकेत स्वतंत्र एस्क्रो खाते उघडणे आवश्यक आहे जेणेकरुन प्राधिकरणाच्या कर्जाच्या परतफेडीची हमी प्राप्त होईल. त्याप्रमाणे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेकरिता कर्जाच्या प्रमुख अटी व शर्ती पुढील प्रमाणे सुचविण्यात येत असल्याचे महानगर आयुक्त यांनी सांगितले :-

| | | |
|---|---|---|
| १. | कर्जदार | कल्याण-डोंबिवली महानगरपालिका |
| २. | प्रकल्पाचे नाव | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM) अंतर्गत मंजूर झालेल्या रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण |
| ३ | प्रकल्पाचा एकूण खर्च | रु. ३३८.५१ कोटी |
| ४. | प्रस्तावित कर्ज रक्कम | रु.१६९.२६ कोटी (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM) अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्प खर्चाच्या ५०% पर्यंत मर्यादित) |
| ५. | व्याजाचा दर | १०% द.सा.द.शे. |
| ६. | कर्ज परतफेडीचा कालावधी | १५ वर्ष (मोरॅटोरियम कालावधी लागू नाही) |
| ७. | हमी देणे | कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कर्जाच्या परतफेडीची हमी म्हणून एस्क्रो खाते उघडणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने कर्ज करारपत्र करण्यापूर्वी केडीएमसी-मुंमप्रविप्रा कर्ज परतफेड एस्क्रो खाते या नावाने एस्क्रो खाते राष्ट्रीयकृत बँकेत उघडून त्यामध्ये वेळोवेळी विविध महसुलातून प्राप्त होणारे सर्व उत्पन्न जमा करावे व या खात्यात कायमस्वरुपी प्राधिकरणाच्या कर्ज फेडीचा एक सहामाही हप्ता नेहमीसाठी प्रतिभूती (Security) म्हणून जमा ठेवावा. उर्वरीत रक्कम त्याच बँकेत महापालिकेच्या दुस-या खात्यात इतर खर्चासाठी जमा करता येईल. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या पूर्वीच्या कर्जासाठी अस्तित्वात असलेले एस्क्रो खाते या कर्जासाठी परंतू, त्यासाठी आवश्यक असलेले अतिरिक्त किमान शिल्लक एस्क्रो खात्यामध्ये ठेवून चालू ठेवण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ८ | कर्ज वितरण व्यवस्था | अ)एकूण मंजूर कर्ज रक्कम प्रकल्पांवरील खर्चाचे प्रमाणित विवरणपत्र सादर केल्यानंतर प्रतिपूर्तीच्या आधारे वेळोवेळी वितरित करण्यात येईल. महाराष्ट्र शासनामार्फत सदर प्रकल्पासाठी मिळालेल्या अनुदानाची रक्कम संपूर्ण वापरल्यानंतरच मंजूर कर्ज वितरित करण्यात येईल.<br>ब) कर्ज करारपत्र करण्यापूर्वी प्रकल्पांवर केलेला खर्च प्रतिपूर्तीसाठी ग्राहय धरण्यात येईल.<br><br>क) महानगरपालिकेला वितरित करण्यात येणारी प्रत्येक कर्ज हप्त्याची रक्कम एस्क्रो खात्यात प्रथम जमा केली जाईल. |
| ९ | कर्ज बंद होण्याचा दिनांक | दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत प्रकल्पांवर झालेला खर्च कर्ज म्हणून प्रतिपूर्तीसाठी पात्र असेल.<br>तसेच प्राधिकरणाने कर्ज मंजूर केल्यावर प्राधिकरण, महानगरपालिका व एस्क्रो बँक यांच्यामध्ये ९ महिन्याच्या आत त्रिपक्षीय कर्ज करारनामा होणे आवश्यक आहे. |
| १० | कर्जपरतफेड कालावधीतील सूट (मोरॅटोरियम) | लागू नाही |
| ११ | व्याजासह कर्जाची परतफेड | प्रतिवर्षी ३० जून व ३१ डिसेंबर रोजी सहामाही समान हप्त्यात. |

तसेच महानगर आयुक्त यांनी कर्ज सहाय्याच्या इतर अटी व शर्ती पुढील प्रमाणे असतील असेही सांगितले :-

अ) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कर्ज परतफेडीचा हप्ता भरण्यासाठी तसेच प्रकल्पांची दुरुस्ती व देखभालीसाठी (O&M) आवश्यक असलेली खर्चाची तरतूद वार्षिक अंदाजपत्रकात करणे आवश्यक असेल.

ब) प्राधिकरणाच्या लेखी परवानगीशिवाय महानगरपालिकेने कुठल्याही प्रकारचे नवीन कर्ज कोणत्याही संस्थांकडून उभारु नये.

क) प्राधिकरण मुंबई प्रांतीक (Provincial) महानगरपालिका अधिनियम, १९४९ मधील तरतुदींच्या अधीन राहून महानगरपालिकेच्या महसुली जमा रक्कमेवर प्रथम हक्क बजावील.

ड) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४४ अन्वये अेरीयर्स ऑफ लँड रेव्हेन्यूच्या स्वरुपात प्राधिकरण महानगरपालिकेकडून थकित रक्कम वसूल करु शकेल.

इ) कर्ज करारनामा करणेपूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रस्त्यांचे कॉंक्रिटीकरण प्रकल्पाच्या मंजूर घटकांच्या अंमलबजावणीसाठी केलेला खर्च कर्ज वितरणासाठी ग्राहय धरला जाईल.

ई) महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १०९ नुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत (MURM) सादर केलेल्या प्रकल्पांसाठी रु. १६९.२६ कोटी इतके कर्ज प्राधिकरणाकडून घेण्यासाठी कर्ज करारपत्र करण्यापूर्वी शासनाची मंजूरी मिळवावी.

१०.७ महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित करताना असे सांगितले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत (MURM) राज्य शासनाने मंजूर केलेल्या प्रकल्पावर स्वतः करावयाच्या खर्चाच्या हिश्यापोटी रु.१६९.२६ कोटी, पालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन, मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस रु.१६९.२६ कोटी इतके कर्ज रक्कम द.सा.द.शे. १०% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी देण्यास मान्यता देण्यात यावी.

१०.८ याबाबत प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रकाश बिनसाळे, विधान परिषद सदस्य यांनी शहरामध्ये कॉंक्रिटचे अथवा डांबरीकरणाचे रस्ते बांधण्याच्या आवश्यकतेबाबत निकष असल्यास ते विचारात घेणे उचित ठरेल असे मत प्रदर्शित केले. याबाबत प्राधिकरणाचे सदस्य श्री. श्रीकांत सिंह, प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग यांनी कॉंक्रिट अथवा डांबरीकरणाचे रस्ते हाती घेणेबाबत मिरानी समितीने अहवाल सादर केलेला असून त्यामध्ये कॉंक्रिट अथवा डांबरीकरणाचे रस्ते घेण्याबाबतची नियमपुस्तिका सादर करण्यात आली असल्याचे स्पष्ट केले. त्याप्रमाणे मा. सदस्यांनी सदर नियमपुस्तिकेची एक प्रत देण्याबाबत विनंती केली.

..२३/-

तसेच महानगर आयुक्त व प्राधिकरणाचे सदस्य श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी सदर काँक्रिटीकरणाच्या प्रस्तावास शासनाने "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत (MURM)" मंजुरी देऊन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस अनुदान वितरित करण्यात आले असून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेद्वारे सदर रस्त्यांच्या कामांची अंमलबजावणी सुरु असल्याने सदर प्रस्तावास मान्यता देणे योग्य होईल असे मत प्रदर्शित केले.

१०.९ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. १२९९ :

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या व यासंबधी त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MURM)" अंतर्गत राज्य शासनाने मंजूर केलेल्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरण या प्रकल्पासाठी पालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस रु. १६९.२६ कोटी इतकी कर्ज रक्कम द.सा.द.शे. १०% व्याजदर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या अधीन राहून देण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कर्जाची रक्कम, व्याजदर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त एस्क्रो खात्यासंबंधी तपशील व कर्ज परतफेडीतील सुट्टीचा कालावधी निश्चित करणे, तसेच प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तीमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

**बाब क्र.११ : पनवेल तालुक्यात स्थित असलेल्या रेंटल हाऊसिंग प्रकल्पांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत (MJP) पाणी पुरवठयाची तरतूद करणेबाबत.**

११.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण धोरण-२००७ ला अनुसरुन भाडे तत्वावरील घरे प्रकल्पासाठी २००८ साली महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची अंमलबजावणी संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या प्रकल्पात १६० चौ.फूट तळपृष्ठ चटई क्षेत्र असणा-या स्वतंत्र सोयी सुविधांनी युक्तशी घरे उपलब्ध करुन घेणे प्रस्तावित असून काम करण्यास इच्छुक विकासक/जमीनमालक/अथवा इतर संस्थांकडून निवासी संकुल उभारणी करुन घेण्याची तरतूद आहे. सदर प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशातील नगरपालिका, महानगरपालिका तसेच उर्वरित महानगर क्षेत्राच्या नागरीक्षम - १ व २ या विभागांमध्ये अनुज्ञेय आहे.

११.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, भाडे तत्वावरील घरे संकुलामध्ये लागणा-या पायाभूत सोयी सुविधा विकासकामार्फत पुरविण्यात येतील व प्रकल्प क्षेत्रापर्यंत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांची असून पालिकेबाहेरील क्षेत्रात स्थित असलेल्या प्रकल्पांपर्यंत अशा सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्राधिकरण प्रयत्नशील आहे.

११.३ पुढे महानगर आयुक्तांनी पनवेल तालुक्यातील रेन्टल हौसिंग योजनांना पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत असे सांगितले की, लोकेशन क्लिअरन्स दिलेल्या ५४ प्रकल्पांपैकी १५ प्रकल्प पनवेल तालुक्यातील नागरीक्षम परिमंडळात दोन समूहांत स्थित आहेत. भाडे तत्वावरील घरे योजनांचा एक समूह रोहिंजण गावात खारघर, नवी मुंबईच्या जवळ आहे तर दुसरा समूह पनवेल नगरपरिषदेबाहेर जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील पळस्पे फाटयाजवळ स्थित आहे. सदर दोन समूहांमध्ये सुमारे ४.३ लाख इतकी लोकसंख्या वास्तव्यास येणे अपेक्षित असून त्यासाठी ७० द.ल.लि./दिन (MLD)

पाण्याची आवश्यकता आहे. रोहिंजण येथील समूहात या व्यतिरिक्तही प्रकल्प मंजूर होण्याची संभावना लक्षात घेता आवश्यक पाण्याची गरज ८५ द.ल.लि./दिन (MLD) पर्यंत जाण्याची शक्यता आहे.

महानगर आयुक्त यांनी पुढे असा खुलासा दिला की, या दोन समूहातील ६ प्रकल्पांचे बांधकाम प्रगती पथावर असल्याने तातडीने पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. या क्षेत्रात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (MJP) जलवाहिनी उपलब्ध असल्यामुळे (JNPT, CIDCO आणि पनवेल नगरपरिषद यांना पुरवठा करणा-या) प्राधिकरणाने सदर संस्थेस भाडे तत्वावरील घरांच्या योजनांसाठी पाणी पुरवठा करण्याबाबत विनंती केली असून याबाबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून ८५ द.ल.लि./दिन (MLD) पाणी पुरवठा करण्यासाठी रु.९४ कोटीचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

११.४ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रस्तावासंदर्भात सांगताना महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये त्यांच्या सद्य:स्थितीत उपलब्ध असलेल्या योजनेची क्षमता वाढविणे तसेच कळंबोली फाटयापासून (Junction) रोहिंजन पर्यंत नवीन जलवाहिनी टाकणे अशा दोन बाबींचा समावेश आहे आणि यासंबंधी लागणारा खर्च रु.६५ कोटी व रु.२९.१६ कोटी (एकूण रु.९४.१६ कोटी) इतका आहे. परंतू, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ढोबळ मानाने रु.९४.०० कोटीची मागणी केली आहे. सदर प्रस्तावाला प्राधिकरणाने दिनांक १४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्राद्वारे तत्वत: मान्यता दर्शविली आहे.

११.५ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या प्रस्तावासाठी लागणा-या निधीची उपलब्धता कशाप्रकारे करणे शक्य होईल याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, सदर पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी लागणारा निधी खालील ३ स्त्रोताद्वारे उपलब्ध होऊ शकतो :-

१. भाडे तत्वावरील घरे योजनेच्या अंमलबजावणी बाबतीतील शासकीय अधिसूचनेमध्ये असलेल्या तरतूदीनुसार मिळणारे पायाभूत सुविधा शुल्क (सुमारे रु. १०० कोटी).

आहेत याबाबत तसेच सद्यःस्थितीत पनवेल शहर व इतर भागांकरिता उपलब्ध असलेल्या पाण्याची कमतरता लक्षात घेता प्राधिकरणाने याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. याबाबत अति. महानगर आयुक्त (१) व प्रकल्प संचालक यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या रू. २०९ कोटी खर्चाच्या प्रकल्पामध्ये मोर्बे धरणाच्या स्त्रोतांच्या क्षमता वाढविण्याबाबतच्या खर्चाचा सुध्दा समावेश असल्याने याव्दारे उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सदर योजनेकरिता वापरले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

११.७ वरील चर्चेनंतर, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर बाब टिप्पणी मध्ये नमुद केलेला प्रस्ताव अंतिमतः मान्य करावा किंवा कसे हा मुद्दा सभेत मांडला.

यानंतर अति. महानगर आयुक्त (१) व प्रकल्प संचालक यांनी पनवेल परिसरात मंजूर केलेल्या रेंटल हौसिंग योजनेअंतर्गत ब-याच ठिकाणी जागेवर बांधकाम चालू झाले असल्यामुळे सदर योजनांना पाणी पुरवठा मिळण्याबाबत ठराविक वेळेत निर्णय घेणे गरजेचे आहे असे नमुद करून सदर प्रस्ताव मान्य करण्याबाबत विनंती केली.

११.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १३०० :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम २१-अ अन्वये व त्यास यासंबधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, पनवेल तालुक्यातील रोहिंजण आणि पळस्पे फाटा येथील दोन समुहांमध्ये स्थित असलेल्या भाडे तत्वावरील घरे योजनांसाठी लागणा-या ८५ द.ल.लि./दिन (MLD) पाण्याचा पुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करुन घेण्यासाठी तसेच यासाठी लागणारे रु.९४ कोटीच्या खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरिल ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

२. भविष्यात अतिरिक्त पायाभूत सुविधा मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाने पुरविल्यास त्यासाठी होणा-या एकूण खर्चाच्या ७५% विकासकाचा वाटा (विकासकाकडून हमीपत्र घेणे प्रस्तावित आहे).

३. भाडे तत्वावरील घरांच्या विक्रीतून उपलब्ध होणारे अतिरिक्त निधी.

तसेच महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणामार्फत पाणी पुरवठयासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात येणारा निधी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामाच्या प्रगतीनुसार वितरित करण्यात येईल.

११.६ याबाबत चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी असे नमुद केले की, मुंबई महानगर क्षेत्राच्या नियोजनाचा भाग म्हणून पाणी पुरवठयाबाबत निर्णय घेण्याचा अधिकार महानगर नियोजन समितीकडे (MPC) असल्यामुळे सदर प्रस्तावाबाबत या समितीकडे विचारणा केली आहे किंवा कसे. त्यानंतर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सुचविले की, चितळे कमिटीने मुंबई शहर व उर्वरित महानगर क्षेत्रामध्ये पाणी पुरवठा याबाबत तयार केलेल्या अहवालांमध्ये सुचविलेल्या स्त्रोतांच्या विकासाबाबतची सद्यःस्थिती बाबत महानगर आयुक्तांनी प्रादेशिक स्तरावरील सुविधा म्हणून बृहन्मुंबई महानगरपालिका व जलसिंचन विभाग यांच्यासोबत संयुक्त आढावा बैठक घ्यावी.

महापालिका आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे नमूद केले की, चितळे समितीच्या अहवालामध्ये सुचविल्याप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रासाठी आवश्यक असलेल्या पाणी पुरवठा प्रकल्पांची अंमलबजावणी बाबत कार्यवाही होत आहे. तसेच प्राधिकरणामार्फत उर्वरीत महानगर प्रदेशाकरिता आवश्यक असलेल्या इतर प्रकल्पांपैकी काही प्रकल्पांना जलसिंचन विभागामार्फत विकसित करण्याबाबत येत असलेल्या विविध स्थानिक अडचणी अति. महानगर आयुक्त (२) यांनी विषद केल्या.

प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी रेंटल हौसिंग साठी आवश्यक असलेल्या पाण्याची गरज भागविण्यासाठी कोणते स्त्रोत वापरण्यात येणार

..२७/-

आहेत याबाबत तसेच सद्य:स्थितीत पनवेल शहर व इतर भागांकरिता उपलब्ध असलेल्या पाण्याची कमतरता लक्षात घेता प्राधिकरणाने याबाबत विचार करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. याबाबत अति. महानगर आयुक्त (१) व प्रकल्प संचालक यांनी असे स्पष्ट केले की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या रू. २०९ कोटी खर्चाच्या प्रकल्पामध्ये मोर्बे धरणाच्या स्त्रोतांच्या क्षमता वाढविण्याबाबतच्या खर्चाचा सुध्दा समावेश असल्याने याव्दारे उपलब्ध होणारे अतिरिक्त पाणी सदर योजनेकरिता वापरले जाणार असल्याचे स्पष्ट केले.

११.७ वरील चर्चेनंतर, मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर बाब टिप्पणी मध्ये नमुद केलेला प्रस्ताव अंतिमतः मान्य करावा किंवा कसे हा मुद्दा सभेत मांडला.

यानंतर अति. महानगर आयुक्त (१) व प्रकल्प संचालक यांनी पनवेल परिसरात मंजूर केलेल्या रेंटल हौसिंग योजनेअंतर्गत ब-याच ठिकाणी जागेवर बांधकाम चालू झाले असल्यामुळे सदर योजनांना पाणी पुरवठा मिळण्याबाबत ठराविक वेळेत निर्णय घेणे गरजेचे आहे असे नमुद करून सदर प्रस्ताव मान्य करण्याबाबत विनंती केली.

११.८ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १३०० :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम २१-अ अन्वये व त्यास यासंबधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, पनवेल तालुक्यातील रोहिंजण आणि पळस्पे फाटा येथील दोन समुहांमध्ये स्थित असलेल्या भाडे तत्वावरील घरे योजनांसाठी लागणा-या ८५ द.ल.लि./दिन (MLD) पाण्याचा पुरवठा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करुन घेण्यासाठी तसेच यासाठी लागणारे रु.९४ कोटीच्या खर्चास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरिल ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे"

**<u>बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेशातील पनवेल तालुक्यातील गावांच्या सभोवताली अंमलबजावणी होत असलेल्या मोठया प्रकल्पांच्या गावांच्या एकात्मिक समूह ग्रामीण विकास योजनासाठी विशेष निधी उपलब्ध करुन देणेबाबत.</u>**

१२.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशातील ग्रामीण भागांच्या विकासाकरिता एकात्मिक ग्राम विकास योजनेंतर्गत संबंधित जिल्हा परिषदांना पायाभूत सुविधांच्या अंमलबजावणीकरिता अनुदान स्वरुपात निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. परंतु सदर निधीचा वापर संबंधित जिल्हा परिषदांमार्फत विहित वेळेत होत नसल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आल्याने मुंबई महानगर प्रदेशात स्थित असलेल्या महानगर प्रदेशातील गावठाण्यांचे सर्वेक्षण करुन नविन प्रस्ताव तयार करण्याचे उद्देशाने प्राधिकरणातर्फे एक पथदर्शक योजना पनवेल तालुक्यामध्ये हाती घेण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक २२ ऑक्टोबर, २०१२ रोजी झालेल्या १३१ व्या बैठकीमध्ये मंजूरी देण्यात आली होती.

१२.२ महानगर आयुक्त यांनी त्याअनुषंगाने असे सांगितले की, पनवेल तालुक्यातील सभोवतालच्या ज्या गावांमध्ये मोठे प्रकल्प जसे, रेंटल हौसिंग योजना, इतर रहिवाशी संकुले आणि परिवहनदृष्टया येणा-या भावी प्रकल्प जसे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, बहुउद्देशीय वाहतूक मार्गिका (Multi Modal Corridor) राबविण्यात / प्रस्तावित आहेत अशा गावांचे सर्वेक्षण करुन स्थानिक आमदार यांच्या सहमतीने एकूण १९ गावे निवडण्यात आली असून त्यात प्राधिकरणामार्फत सध्या राबविण्यात येणा-या एकात्मिक ग्राम विकास योजनेत निवडण्यात आलेल्या ६ गावांचाही समावेश असल्याचे नमूद केले.

१२.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही स्पष्ट केले की, दरम्यानच्या काळात नवी मुंबई विमानतळ प्रभावित अधिसूचित क्षेत्राकरिता (NAINA) शासनामार्फत दिनांक १० जानेवारी, २०१३ रोजी शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (CIDCO) या संस्थेस "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त करण्यात येत असल्याची अधिसूचना प्रसिध्द

झालेली आहे. त्यामुळे सदर क्षेत्राचे नियोजन करुन आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे सिडको या संस्थेच्या कार्यक्षेत्रात येत आहे. तसेच सदर क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांचे नियोजन व विकास करणे ही जबाबदारी सुध्दा सिडकोवर राहणार आहे. वर नमूद केलेली १९ गावे ही सुध्दा सदर अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट आहेत.

१२.४ तथापि, महानगर आयुक्त यांनी प्रस्तावित करताना असे सांगितले की, वरील परिस्थिती विचारात घेता प्राधिकरणाने यापूर्वी ठरविल्याप्रमाणे मा. आमदारांच्या सहमतीने निवडलेल्या १९ गावांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासासाठी पथदर्शक एकात्मिक समूह ग्रामीण विकास योजना हाती घेणे योग्य राहील किंवा याबाबत सिडकोला विनंती करणे योग्य राहील याबाबत निर्णय घेण्यासाठी प्राधिकरणाच्या विचारार्थ सादर करण्यात येत असल्याचे नमूद केले.

१२.५ याबाबत प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी पनवेल व सभोवतालच्या क्षेत्रामध्ये प्राधिकरणामार्फत हाती घेतलेल्या व भविष्यात हाती घेण्यात येणाऱ्या विविध मोठया पायाभूत सुविधा प्रकल्पांचा विचार करता पनवेल शहर व सभोवतालच्या ग्रामीण क्षेत्रावर नागरीकरणाचा ताण पडणार असून त्यादृष्टीने सदर क्षेत्राच्या नियोजनाकरिता सिडको या संस्थेस "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून जरी नेमण्यात आले असले तरी सदर संस्थेमार्फत या संपूर्ण क्षेत्राचा आराखडा तयार करण्यास वेळ लागणार असल्याने सदर १९ गावांच्या मुलभूत सुविधांच्या सुधारणांना एक विशेष पॅकेज म्हणून प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन द्यावा असा आग्रह धरला.

याबाबत मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे स्पष्ट केले की, सदर १९ गावांचा सिडकोच्या "विशेष नियोजन प्राधिकरण" क्षेत्रात समावेश असल्याने सदर क्षेत्राचा नियोजित आराखडा तयार केल्यानंतर आराखडयास मंजूरी मिळाल्यानंतर त्यात प्रस्तावित असलेल्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देणे योग्य होईल. त्यामुळे सदर प्रस्ताव लांबणीवर टाकण्यात येत असल्याचे मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी स्पष्ट केले.

परंतु प्राधिकरणाचे सदस्य श्री. प्रशांत ठाकूर, विधानसभा सदस्य यांनी सदर अधिसूचित क्षेत्रात अनेक गावांचा समावेश असल्यामुळे सदर क्षेत्राचा नियोजित आराखडा सिडकोमार्फत तयार करुन मंजूर होण्यास वेळ लागण्याची शक्यता आहे. ही बाब लक्षात घेता प्राधान्यक्रमाने सदर १९ गावांकरिता सिडकोमार्फत आराखडा तयार करुन मंजूरी घेण्याची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करण्याची विनंती केली. त्यानुसार मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सदर क्षेत्रासाठीच्या आराखडयाचा हिस्सा म्हणून तात्पुरत्या स्वरुपात सदर १९ गावांचा आराखडा पुढील ६ महिन्यात तयार करण्याचे सिडकोला निर्देश दिले आणि त्यानंतर प्रस्तावित पथदर्शक योजना तयार करुन प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश दिले.

**बाब क्र.१३: वडाळा भारवाहक तळातील वाटप केलेला भूखंड क्र.ब्लॉक-सी चा ताबा टप्याटप्याने दिला असल्यामुळे अधिमूल्याची रक्कमही त्या प्रमाणात आकारण्याबाबत.**

१३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वडाळा भारवाहक तळ येथील भूखंड क्र.ब्लॉक-सी हा वाणिज्य वापराचा भूखंड भाडेपट्टयाने वाटप करण्याकरिता निविदा मागवून प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१० रोजी झालेल्या १२७व्या बैठकीत प्रस्ताव सादर केला होता. प्राधिकरणाने त्यांचा ठराव क्र.१२३९ अन्वये सदर भूखंड हा उच्चत्तम पात्र निविदाकार मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा. लि. यांना वितरीत करण्यास मान्यता दिली. या प्रस्तावामध्ये दिल्याप्रमाणे निविदाकाराने अधिमूल्याची रक्कम ५ वर्षात व्याजासह खालील तक्त्यात दिल्याप्रमाणे भरण्याचे अपेक्षित होते.

| Estd. Cost | Percentage (%) | Amount (Rs. In Crores) | Cummulative Amount (Rs. In Crores) | Interest (Rs. In Crores) | Amount+ Interest (Rs. In Crores) |
|---|---|---|---|---|---|
| Upfront (In 3 months from date of offer letter) | 10% | 405 | 405 | 0 | 405 |
| Year 1 | 5% | 202.5 | 607.5 | 20.25 | 222.75 |
| Year 2 | 10% | 405 | 1020.5 | 85.05 | 490.05 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Year 3 | 15% | 607.5 | 1620 | 201.08 | 808.58 |
| Year 4 | 20% | 810 | 2430 | 375.92 | 1185.92 |
| Year 5 | 40% | 1620 | 4050 | 989.03 | 2609.03 |
| **Total** | | **4050** | | **1671.33** | **5721.33** |

१३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, बाब टिप्पणीमधील परिच्छेद-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या वरील मान्यतेनुसार मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना दिनांक २२ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या पत्रान्वये भूखंड वितरणाचे देकार पत्र देण्यात आले आहे. सदर देकार पत्रानुसार निविदाकाराने अधिमुल्याचा पहिला हप्ता रु.४०५ कोटी इतका दिनांक २३ फेब्रुवारी, २०११ रोजी भरणा केला. मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांनी अधिमुल्याचा पहिला हप्ता भरल्यानंतर भाडेपट्टा करार साक्षांकित करुन वितरीत केलेल्या भूखंडाचा ताबा देणे आवश्यक होते. परंतु, वडाळा भारवाहक तळ येथे जो भूखंड मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना वितरीत केला होता, तो भूखंड निविदा प्रक्रिया सुरु होण्यापूर्वीच प्राधिकरण राबवित असलेल्या महत्वाच्या प्रकल्पांसाठी ठेकेदारांना एका वेळी ११ महिन्याच्या करारावर तात्पुरत्या वापरास भाडेपट्टयाने कास्टींग यार्ड उभारण्यासाठी दिला होता. बाब टिप्पणी मधील परिच्छेद-२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाचे प्रकल्प राबविणा-या ठेकेदारांना/कंपन्यांकडून सदर जमीन ही निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वी प्राधिकरणाच्या ताब्यात मिळेल असे नियोजित होते. त्यानुसार तात्पुरता वापर करीत असलेल्या जमिनीपैकी वितरीत करावयाची जमीन रिकामी करुन देण्याबाबत प्रकल्प राबविणाऱ्या ठेकेदारांना नोटीसा देण्यात आल्या. मात्र प्रकल्प राबवित असताना ब-याच अडचणी निर्माण झाल्या उदा. रस्त्यात येणा-या झोपडयांचे पुनर्वसन, भूसंपादन, बाधित धार्मिक स्थळे, रेल्वे मार्गावरुन जाणारे पूल, जमिनी खालून जाणा-या पाण्याच्या पाईप लाईन इ. अडचणी आल्या, त्यामुळे प्रकल्प वेळेत पूर्ण होऊ शकले नाहीत. त्यामुळे मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना वितरीत करावयाची जमीन वेळेत प्राधिकरणाच्या ताब्यात मिळाली नाही. सबब, संबंधीत ठेकेदारांना वितरीत केलेल्या क्षेत्राला मुदतवाढ दयावी लागली. त्यामुळे मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांनी पहिला हप्ता दिनांक २३ फेब्रुवारी, २०११ रोजी भरुनही तद्नंतर भाडेपट्टा करार करण्यास कालावधी गेला. दरम्यानच्या कालावधीत

प्राधिकरणाने बाब टिप्पणीच्या परिच्छेद-२ मध्ये नमूद केलेल्या ठेकेदारांपैकी अ.क्र.१ मधील प्रकल्पाचे ठेकेदार मे. सिम्पलेक्स इन्फास्ट्रक्चर प्रा.लि. हे तात्पुरता वापर करीत असलेल्या ४.२२ हेक्टर जमीनीचा त्यांच्याकडून दिनांक १२ जून, २०११ रोजी ताबा घेऊन मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांची संमती घेऊन त्यांना ४.२२ हेक्टर क्षेत्र असलेल्या भूखंडाचा दिनांक १ ऑगस्ट, २०११ रोजी ताबा दिला.

१३.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांच्यासोबत दिनांक १ ऑगस्ट, २०११ रोजी भाडेपट्टा करार साक्षांकित केला. या भाडेपट्टा करारामधील परिच्छेद ५ मध्ये दिलेल्या तक्तयाप्रमाणे अधिमूल्याची रक्कम भाडेपट्टेदाराने भरणे आवश्यक आहे. मे.लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांच्याशी उपरोक्त प्रमाणे साक्षांकित केलेल्या भाडेपट्टा करारातील तरतुदीनुसार त्यांना वितरीत करण्यात आलेल्या ९.२६ हेक्टर क्षेत्रापैकी उपरोक्तप्रमाणे ताब्यात दिलेले ४.२२ हेक्टर क्षेत्र वजा करता उर्वरित राहिलेले ५.०४ हेक्टर इतके क्षेत्र दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पूर्वी ताब्यात देणे आवश्यक होते. परंतु, या क्षेत्रापैकी ४.५५ हेक्टर इतके क्षेत्र वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता कास्टींग यार्डसाठी मे. मुंबई मेट्रो वन प्रा.लि. यांना तसेच मे.एल. अँन्ड टी स्कोमी इंजिनिअरिंग बी.एच.डी. कन्सोर्टियम यांना ०.४९ हेक्टर असे एकूण ५.०४ हेक्टर क्षेत्र देण्यात आले होते. मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामासाठी अगोदरच दिरंगाई झालेली असल्याने व काम अंतिम टप्प्यात असल्याने त्यांना वितरीत केलेले क्षेत्र वेळेत रिक्त होऊ शकले नाही मात्र प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असल्यामुळे जमीन रिकामी करुन घेणे शक्य नसल्यामुळे प्राधिकरणाचे आर्थिक नुकसान होऊ नये म्हणून निविदाकाराला द्यावयाच्या जमिनीला दिनांक ११ ऑक्टोंबर, २०११ पासून व्यावसायिक दराने भाडे आकारणी करुन त्यांना मुदतवाढ देण्यात आली. त्यांच्याकडून रु. १७.०७ कोटी वसुल करण्यात आले. मे.मुंबई मेट्रो वन प्रा.लि. यांनी तसेच मोनो रेल्वेचा प्रकल्प राबविणारी कंपनी मे. एल. अँन्ड टी स्कोमी इंजिनिअरिंग बी.एच.डी. कन्सोर्टियम यांनी तात्पुरता वापर करीत असलेले क्षेत्र जसजसे रिक्त केले तसतसे मे. लोढा क्रॉऊन बिल्डमार्ट प्रा. लि. यांना ताब्यात देण्यात आले. सदरची कार्यवाही करुन ठेकेदारांकडून ताबा घेतलेला

..३३/-

दिनांक व मे. लोढा क्रॉऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना ताबा दिलेला दिनांक व क्षेत्र खालीलप्रमाणे आहे : -

| अ. क्र. | प्रकल्पाचे नाव | टेकेदाराचे नांव | क्षेत्रफळ (हे.) | टक्केवारी (%) | भूखंड रिक्त केल्याचा दिनांक | मे. लोढा क्रॉऊन बिल्डमार्ट प्रा. लि. यांना ताबा दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | पूर्व मुक्त मार्ग (Eastern Freeway) | मे. सिम्पलेक्स इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. | ४.२२ | ४५.६०७ | १२/६/२०११ | ०१/०८/२०११ |
| २) | वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मार्गावरील मेट्रो रेल्वे प्रकल्प | मे. मुंबई मेट्रो वन प्रा. लि. | ०.१२ | १.३८५ | ०९/०४/२०१२ | ०९/०४/२०१२ |
| | | | ०.०५ | ०.५६२ | २७/०५/२०१२ | २७/०५/२०१२ |
| | | | ४.३८ | ४७.२५१ | ०५/१०/२०१२ | ०५/१०/२०१२ |
| ३) | मोनो रेल्वे | मे. एल. अँन्ड टी स्कोमी इंजिनिअरिंग बी.एच.डी. कन्सोर्टियम | ०.४९ | ५.१९५ | ०९/०१/२०१३ | ०९/०१/२०१३ |
| | | एकुण क्षेत्र | ९.२६ | १०० | | |

१३.४ त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, बाब टिपणीच्या परिच्छेद ५ मध्ये, विशद केल्यानुसार मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना भाडेपट्टा करारानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०११ पूर्वी संपूर्ण जमिनीचा ताबा देणे आवश्यक होते. परंतु, प्राधिकरणाने आपल्या प्रकल्पाच्या अंमलबजावणी संस्थांना / कंपन्यांना प्रकल्पाच्या कामकाजासाठी या जमिनीपैकी काही जमीन दिलेली असल्याने व प्रकल्पाचा दृष्टीकोनातून त्यांना मुदतवाढ देणे आवश्यक असल्याने अंतिमतः त्यांना दिनांक ०९ जानेवारी, २०१३ रोजी संपूर्ण जमिनीचा ताबा देता येणे शक्य झाले. मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांच्याशी साक्षांकित केलेल्या भाडेपट्टा करारातील अटीनुसार दिनांक १ ऑगस्ट, २०१२ रोजी रु. २२२.७५ कोटीचा पहिला हप्ता देय होत होता. तथापि मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांना जमिनीचा ताबा वेळेत प्राप्त न झाल्याने, ज्या प्रमाणात त्यांना जमिन प्राप्त झाली म्हणजेच दिनांक १ ऑगस्ट, २०११ रोजी ज्या प्रमाणात जमिन प्राप्त झाली (४५.६०७%) त्या प्रमाणात पहिल्या हप्त्यापैकी रक्कम रु.१००,६६,५५,२१६/- (म्हणजेच

..३४/-

रु.२२२.७५ कोटीच्या ४५.१९%) त्यांनी दिनांक ०३ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या पत्रान्वये भरणा केली.

१३.५ तसेच पुढे महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मे. लोढा क्राऊन बिल्डमार्ट प्रा.लि. यांच्याशी प्राधिकरणाने दिनांक १ ऑगस्ट, २०११ रोजी साक्षांकित केलेल्या भाडेपट्टा करारानुसार बाब टिपणीच्या परिच्छेद ३ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव जमिनीचा ताबा त्यांना देता येणे प्राधिकरणास शक्य झाले नाही. ही पार्श्वभूमी विचारात घेता अधिमूल्याची रक्कम अदा करण्याबाबत भाडेपट्टा करारामध्ये नमूद केलेल्या वेळापत्रकामध्ये बदल करुन पुढीलप्रमाणे सुधारीत वेळापत्रक प्रस्तावित केले आहे. मान्य झाल्यास सदर सुधारीत अधिमूल्याचा तक्ता हा सुधारीत भाडेपट्टा करारामध्ये समाविष्ट करण्यात येईल :-

| **Estd. Cost** | | **Possession of land (Sq. M.)** | **% of Land (% @ 9.26 Ha.)** | **Installment percentage (%)** | | **Amount (Rs. In Crores)** | **Cumulatative amount (Rs. In crores)** | **Interest (Rs. In Crores)** | **Amount + interest (Rs. In crores)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| UP front ( In 3 months from date of offer letter) | | | | 10.000% | | 405.000 | 405.000 | 0.000 | 405.000 | 405.000 |
| Year 1 | 1-Aug-12 | 42231.860 | 45.607 | 5.00 | 2.280% | 92.354 | 497.354 | 9.235 | 101.589 | |
| | 9-Apr-13 | 1282.890 | 1.385 | | 0.069% | 2.805 | 500.159 | 0.281 | 3.086 | |
| | 27-May-13 | 520.240 | 0.562 | | 0.028% | 1.138 | 501.297 | 0.114 | 1.251 | |
| | 5-Oct-13 | 43754.040 | 47.251 | | 2.363% | 95.682 | 596.979 | 9.568 | 105.251 | |
| | 9-Jan-14 | 4810.970 | 5.195 | | 0.260% | 10.521 | 607.500 | 1.052 | 11.573 | 222.75 |
| Year 2 | 1-Aug-13 | 42231.860 | 45.607 | 10.00 | 4.561% | 184.707 | 792.207 | 38.789 | 223.496 | |
| | 9-Apr-14 | 1282.890 | 1.385 | | 0.139% | 5.611 | 797.818 | 1.178 | 6.789 | |
| | 27-May-14 | 520.240 | 0.562 | | 0.056% | 2.275 | 800.094 | 0.478 | 2.753 | |
| | 5-Oct-14 | 43754.040 | 47.251 | | 4.725% | 191.365 | 991.459 | 40.187 | 231.551 | |
| | 9-Jan-15 | 4810.970 | 5.195 | | 0.520% | 21.041 | 1012.500 | 4.419 | 25.460 | 490.05 |
| Year 3 | 1-Aug-14 | 42231.860 | 45.607 | 15.00 | 6.841% | 276.833 | 1289.333 | 91.934 | 368.767 | |
| | 9-Apr-15 | 1282.890 | 1.385 | | 0.208% | 8.409 | 1297.742 | 2.793 | 11.202 | |
| | 27-May15 | 520.240 | 0.562 | | 0.084% | 3.410 | 1301.153 | 1.133 | 4.543 | |
| | 5-Oct-15 | 43754.040 | 47.251 | | 7.088% | 286.811 | 1587.964 | 95.248 | 382.059 | |
| | 9-Jan-16 | 4810.970 | 5.195 | | 0.779% | 31.536 | 1619.500 | 10.473 | 42.009 | 808.58 |
| Year 4 | 1-Aug-15 | 42231.860 | 45.607 | 20.00 | 9.121% | 369.415 | 1988.915 | 171.445 | 540.860 | |
| | 9-Apr-16 | 1282.890 | 1.385 | | 0.277% | 11.222 | 2000.137 | 5.208 | 16.430 | |
| | 27-May-16 | 520.240 | 0.562 | | 0.112% | 4.551 | 2004.687 | 2.112 | 6.663 | |
| | 5-Oct-16 | 43754.040 | 47.251 | | 9.450% | 382.730 | 2387.417 | 177.624 | 560.354 | |
| | 9-Jan-17 | 4810.970 | 5.195 | | 1.039% | 42.083 | 2429.500 | 19.531 | 61.614 | 1185.92 |
| Year 5 | 1-Aug-16 | 42231.860 | 45.607 | 40.00 | 18.243% | 738.830 | 3168.330 | 451.065 | 1189.894 | |
| | 9-Apr-17 | 1282.890 | 1.385 | | 0.554% | 22.444 | 3190.773 | 13.702 | 36.146 | |
| | 27-May-17 | 520.240 | 0.562 | | 0.225% | 9.101 | 3199.875 | 5.557 | 14.658 | |
| | 5-Oct-17 | 43754.040 | 47.251 | | 18.900% | 765.459 | 3965.334 | 467.322 | 1232.782 | |
| | 9-Jan-18 | 4810.970 | 5.195 | | 2.078% | 84.166 | 4050.000 | 51.384 | 135.550 | 2609.03 |
| **TOTAL** | | | | 100 | | **4050.000** | | **1671.830** | **5721.33** | **5721.33** |

१३.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, या प्रस्तावातील ठरावा मधल्या पहिल्या परिच्छेदामधील चौथ्या ओळीतील शब्द 'परिच्छेद ६' ऐवजी 'परिच्छेद ७' असे वाचावे.

१३.७ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र. १३०१:</u>

"असा ठराव करण्यात येत आहे की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३चे उप कलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा आणि त्याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे बाब टिप्पणी मधील परिच्छेद ७ मध्ये दिल्याप्रमाणे भाडेपट्टाकरारामध्ये दिलेल्या तक्तयामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता देत आहे. तसेच सुधारीत भाडेपट्टाकरार करण्यास ही मान्यता देत आहे :-

| Estd. Cost | | Possession of land (Sq.M.) | % of Land (% @ 9.26 Ha.) | Installment percentage (%) | | Amount (Rs. In Crores) | Cumulatative amount (Rs. In crores) | Interest (Rs. In Crores) | Amount + interest (Rs. In crores) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| UP front ( In 3 months from date of offer letter) | | | | 10.000% | | 405.000 | 405.000 | 0.000 | 405.000 | 405.000 |
| Year 1 | 1-Aug-12 | 42231.860 | 45.607 | 5.00 | 2.280% | 92.354 | 497.354 | 9.235 | 101.589 | |
| | 9-Apr-13 | 1282.890 | 1.385 | | 0.069% | 2.805 | 500.159 | 0.281 | 3.086 | |
| | 27-May-13 | 520.240 | 0.562 | | 0.028% | 1.138 | 501.297 | 0.114 | 1.251 | |
| | 5-Oct-13 | 43754.040 | 47.251 | | 2.363% | 95.682 | 596.979 | 9.568 | 105.251 | |
| | 9-Jan-14 | 4810.970 | 5.195 | | 0.260% | 10.521 | 607.500 | 1.052 | 11.573 | 222.75 |
| Year 2 | 1-Aug-13 | 42231.860 | 45.607 | 10.00 | 4.561% | 184.707 | 792.207 | 38.789 | 223.496 | |
| | 9-Apr-14 | 1282.890 | 1.385 | | 0.139% | 5.611 | 797.818 | 1.178 | 6.789 | |
| | 27-May-14 | 520.240 | 0.562 | | 0.056% | 2.275 | 800.094 | 0.478 | 2.753 | |
| | 5-Oct-14 | 43754.040 | 47.251 | | 4.725% | 191.365 | 991.459 | 40.187 | 231.551 | |
| | 9-Jan-15 | 4810.970 | 5.195 | | 0.520% | 21.041 | 1012.500 | 4.419 | 25.460 | 490.05 |
| Year 3 | 1-Aug-14 | 42231.860 | 45.607 | 15.00 | 6.841% | 276.833 | 1289.333 | 91.934 | 368.767 | |
| | 9-Apr-15 | 1282.890 | 1.385 | | 0.208% | 8.409 | 1297.742 | 2.793 | 11.202 | |
| | 27-May-15 | 520.240 | 0.562 | | 0.084% | 3.410 | 1301.153 | 1.133 | 4.543 | |
| | 5-Oct-15 | 43754.040 | 47.251 | | 7.088% | 286.811 | 1587.964 | 95.248 | 382.059 | |
| | 9-Jan-16 | 4810.970 | 5.195 | | 0.779% | 31.536 | 1619.500 | 10.473 | 42.009 | 808.58 |
| Year 4 | 1-Aug-15 | 42231.860 | 45.607 | 20.00 | 9.121% | 369.415 | 1988.915 | 171.445 | 540.860 | |
| | 9-Apr-16 | 1282.890 | 1.385 | | 0.277% | 11.222 | 2000.137 | 5.208 | 16.430 | |
| | 27-May-16 | 520.240 | 0.562 | | 0.112% | 4.551 | 2004.687 | 2.112 | 6.663 | |
| | 5-Oct-16 | 43754.040 | 47.251 | | 9.450% | 382.730 | 2387.417 | 177.624 | 560.354 | |
| | 9-Jan-17 | 4810.970 | 5.195 | | 1.039% | 42.083 | 2429.500 | 19.531 | 61.614 | 1185.92 |
| Year 5 | 1-Aug-16 | 42231.860 | 45.607 | 40.00 | 18.243% | 738.830 | 3168.330 | 451.065 | 1189.894 | |
| | 9-Apr-17 | 1282.890 | 1.385 | | 0.554% | 22.444 | 3190.773 | 13.702 | 36.146 | |
| | 27-May-17 | 520.240 | 0.562 | | 0.225% | 9.101 | 3199.875 | 5.557 | 14.658 | |
| | 5-Oct-17 | 43754.040 | 47.251 | | 18.900% | 765.459 | 3965.334 | 467.322 | 1232.782 | |
| | 9-Jan-18 | 4810.970 | 5.195 | | 2.078% | 84.166 | 4050.000 | 51.384 | 135.550 | 2609.03 |
| **TOTAL** | | | | 100 | | **4050.000** | | **1671.830** | **5721.33** | **5721.33** |

"असाही ठराव करण्यात येत आहे की, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबईकडील बाजूस वाहतूक निर्गमनाकरिता (Traffic Dispersal) शिवडी ते वरळी (पूर्व-पश्चिम) या उन्नत जोडमार्गाच्या बांधकाम खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.**

१४.१ या प्रकल्पाची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई पारबंदर प्रकल्पांची व्यवहार्यता ही प्रकल्पाच्या दोन्ही बाजूकडील प्रभावी वाहतूक निर्गमन व्यवस्थेवर (Traffic Dispersal) अवलंबून आहे. या अनुषंगाने मुंबईकडील बाजूस शिवडी ते वरळी (पूर्व-पश्चिम) जोडमार्ग प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागारांची नियुक्ती करण्यात आली होती.

१४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पामध्ये शिवडी ते वरळी या प्रकल्पातील विविध भागांचा समावेश केला आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकरिता २००८ साली जागतिक बँकेच्या माध्यमातून मे.ली असोसिएट्स यांनी तयार केलेल्या Comprehensive Transport Study मध्ये मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्याकरिता प्रस्तावित केलेल्या प्रकल्पांमध्ये शिवडी-वरळी या प्रकल्पाचा समावेश आहे.

१४.३ या प्रकल्पाची सद्यःस्थिती नमूद करताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करणे व कंत्राटदाराच्या नियुक्तीकरिता आवश्यक त्या निविदा प्रक्रियेकरिता प्राधिकरणास सहाय्य करणे या कामाकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे.एन.एन.भोबे अँन्ड असोसिएट्स प्रा.लि. या सल्लागाराची नेमणूक केली आहे.

..३७/-

१४.४ या प्रकल्पाची माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, शिवडी ते वरळी (पूर्व-पश्चिम) जोडमार्गासाठी नियुक्त केलेल्या सल्लागाराच्या वावामध्ये सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे व कंत्राटदाराच्या नियुक्तीकरिता आवश्यक निविदा प्रक्रियेकरिता प्राधिकरणास सहाय्य करणे या गोष्टींचा अंतर्भाव आहे. सदर प्रस्तावित उन्नत जोडमार्गाची लांबी सुमारे, ४.३ कि.मी. असून रुंदी सर्वसाधारणपणे १५.६० मी. प्रस्तावित आहे. प्रस्तावित जोडमार्ग शिवडी रेल्वे स्थानकाच्या पूर्वेकडे सुरु होऊन शिवडी बस आगार, खानोलकर चौक आणि बृहन्मुंबई माहनगरपालिका चौक, सेनापती बापट चौक, एलफिन्स्टन मर्चंट असोसिएशन चौक आणि डॉ.ॲनी बेझंट रस्ता व नारायण हर्डिकर मार्ग येथील चौक जोडतो. या जोडरस्त्यावर एलफिन्स्टन रोड स्थानकाजवळ पश्चिम व मध्य रेल्वे आणि शिवडी रेल्वे स्थानकाजवळ हार्बर व मुंबई पोर्ट ट्रस्ट रेल्वे या ठिकाणी रेल्वेवर पुल बांधणे प्रस्तावित आहे. आचार्य दोदे मार्गावर जी.डी. आंबेकर मार्ग ते डॉ.ई.बोर्जेस मार्ग यांचे दरम्यानच्या लांबीमध्ये सदर मार्ग मोनोरेलच्या वरुन नेणे प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे सदर उन्नतमार्ग डॉ.आंबेडकर मार्गावरील उड्डाणपूल व सेनापती बापट मार्गावरील उड्डाणपूलांच्या वरुन जातो. यामुळे सदर उन्नतमार्गाची उंची जमिनीपासून सुमारे १५ मी. ते २७ मी. इतकी ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

१४.५ सल्लागाराने केलेल्या अभ्यासानुसार असे निर्दशनास आले की, मुंबई पारबंदर प्रकल्पावरील वाहतूकीपैकी सुमारे १५% वाहतूक या मार्गाचा वापर करेल. त्याचप्रमाणे पश्चिम उपनगरांतून नवी मुंबईकडे जाणारी वाहतूक वांद्रे-वरळी सागरी सेतूवरुन येऊन या मार्गाचा वापर करुन नवी मुंबईकडे जाईल असे अपेक्षित आहे. मुंबई पारबंदर प्रकल्पाची व्यवहार्यता (Viability) हा प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यावर मोठया प्रमाणावर अवलंबून आहे असेही दिसून आले आहे. त्यामुळे या प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने हाती घेण्याचे प्रस्तावित आहे असे महानगर आयुक्त यांनी सांगितले.

१४.६ प्राधिकरणाचे सदस्य श्री.सुनिल प्रभू, मुंबईचे महापौर यांनी हा प्रकल्प राबविताना बृहन्मुंबई महानगरपालिकेला या प्रकल्पाची माहिती दयावी असे नमूद केले. यावर

महानगर आयुक्त यांनी सदर प्रकल्पाची मांडणी (alignment) ही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखडयामध्ये (Development Plan) दर्शविण्यात आलेल्या रस्त्यावरुनच घेण्यात आल्याचे सांगितले. तसेच या उन्नतमार्गाचा जो भाग ड्रेनेज चॅनेल रस्त्यावरील बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मार्गावरुन प्रस्तावित आहे. तेथील झोपडयांच्या निष्कासन/पुनर्वसनाची कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रगतीपथावर आहे. त्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांशी वेळोवेळी बैठका घेऊन पाठपुरावा करण्यात येत आहे.

१४.७ प्राधिकरणाच्या काही सदस्यांनी या रस्त्याची आखणीमण्ये रेल्वे ओलांडणी पूल (Rail Over Bridge) असल्याचे निदर्शनास आणले. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अन्य काही प्रकल्पांमध्ये असणा-या रेल्वे ओलांडणी पूलांच्या बांधकामास विलंब झाल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणले. महानगर आयुक्त यांनी सदर रेल्वे ओलांडणी पूलांचे नकाशे संबंधीत रेल्वेकडे सादर केले असून एलफिन्स्टन रोड येथील रेल्वे ओलांडणी पूलाच्या नकाशास मुख्य पूल अभियंता, मध्य रेल्वे यांनी तत्वत: मान्यता दिल्याचे नमूद केले. त्याचप्रमाणे पश्चिम रेल्वे व हार्बर रेल्वे यांचे कार्यलयाकडेही मान्यतेकरिता पाठपुरावा चालू आहे.

१४.८ सल्लागारांकडून सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्यात आलेला आहे. या प्राथमिक प्रकल्प अहवालामध्ये सादर करण्यात आलेल्या ढोबळ अंदाजपत्रकामध्ये प्रकल्पाच्या बांधकामाची अंदाजित किंमत रुपये ५१७ कोटी इतकी नमूद करण्यात आलेली असल्याची माहिती महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणास दिली.

१४.९ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी हा प्रकल्प, मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या निर्गमन व्यवस्थेचा (Traffic Dispersal) महत्वाचा भाग असून सदर प्रकल्पाची अंमलबजावणी लवकरात लवकर होणे आवश्यक असल्याचे नमूद केले.

१४.१० त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३०२:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम,१९७४ च्या कलम १२चे उप-कलम (१) चे पोट-कलम (ग) व (आय) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याव्दारे शिवडी ते वरळी उन्नत जोडमार्गाचे बांधकामाकरिता रुपये ५१७ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाची अंमलबजावणी करणेकरिता आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करणेकरिता महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीच्या भाडेपट्टेदारांस इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी लागणा-या विलंबनाबाबत.**

१५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या मागील बैठकीमध्ये प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनीच्या भाडेपट्टेदारांस इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्यासाठीचा कालावधी ४ वर्षावरुन ६ वर्षापर्यंत वाढविण्याबाबतचा प्रस्ताव मंजूरीसाठी ठेवण्यात आला होता. त्यानंतर मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्या दिनांक २३ ऑक्टोबर, २०१२ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे वरील विषयाबाबतची बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या पुर्नविचारार्थ सादर केली आहे. तसेच पुढे असेही सांगितले की, प्राधिकरणाने पूर्वी वाटप केलेल्या भूखंडासाठी भाडेपट्टाकरार किंवा भाडेपट्टाविलेख केला असल्यामुळे त्यामध्ये भाडेपट्टादाराने भाडेपट्टाकरार केल्याच्या दिनांकापासून ४ वर्षात बांधकाम पूर्ण करण्याची अट आहे. त्यानंतर महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, सिडकोमध्ये सुध्दा वाटप केलेल्या भूखंडांमध्ये हीच अट आहे.

१५.२ सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, यापुढेही प्राधिकरणाच्या भाडेपट्टाकरारामध्ये ४ वर्षात बांधकाम पूर्ण करण्याची अट तशीच ठेवावी. ज्यावेळी प्राधिकरणास नवीन भूखंड विक्रीला काढायचा असेल, त्यावेळी याबद्दल विचार करता येईल.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा केलेले विषय :-**

प्राधिकरणाच्या दिनांक २३ मार्च, २०१३ रोजी झालेल्या १३२ व्या बैठकीत सादर केलेल्या विविध बाब टिप्पणीच्या चर्चेच्या वेळेस प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य यांनी अशी विचारणा केली की, प्राधिकरणाने कल्याण डोबिंवली येथील २७ गावे व भिवंडी येथील ६० गावे याबाबत प्राधिकरणाने विकास योजना व विकास नियंत्रण नियमावली बनवून ती प्रसिध्द करण्यास मान्यता दिली आहे. त्याचे पुढे काय झाले याबाबत माहिती देण्यास सांगितले. याबाबत श्री. एस.व्ही.आर.श्रीनिवास, अति. महानगर आयुक्त (१) यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाने कल्याण डोंबिवली येथील २७ व भिवंडी येथील ६० गावे यासाठी बनविलेली विकास नियंत्रण नियमावली अनुक्रमे सप्टेंबर, २०१२ व ऑक्टोबर, २०१२ मध्ये शासनास मंजूरीसाठी सादर केली आहे. तसेच या दोन्ही क्षेत्रांसाठी बनविलेला प्रारुप विकास योजना शासनास डिसेंबर, २०१२ मध्ये मंजूरीसाठी सादर केले आहेत. याबाबत मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांना विचारणा केली की, प्राधिकरणाने सादर केलेल्या या प्रस्तावाचे पुढे काय झाले?

याबाबत प्राधिकरणाचे सदस्य श्री. मनु कुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव (१), नगर विकास विभाग यांनी असे सांगितले की, वरील दोन्ही क्षेत्रांसाठी बनविलेल्या विकास नियंत्रण नियमावलीची छाननी पूर्ण झाली असून त्या पुढील मान्यतेसाठी येत्या आठवडयात सादर केल्या जातील.

वरील माहितीची प्राधिकरणाने नोंद घेतली.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

XOX

**जोडपत्रे- १ ते ४**

जोडपत्र-१

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १३२वी बैठक

**दिनांक : २३ मार्च, २०१३**

**: ठराव :**

"श्री.रा.ता.कदम, माजी महापौर, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे दिनांक ०८ डिसेंबर, २०१२ रोजी निधन झाले. श्री. कदम हे दिनांक १४ मार्च, १९९२ ते दिनांक १० मे, १९९३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष तसेच दिनांक ०३ एप्रिल, १९९५ ते दिनांक ०२ एप्रिल, १९९६ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेचे महापौर या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. तसेच दिनांक ०४ डिसेंबर, १९९७ ते दिनांक ०९ मार्च, २००२ या कालावधीत नगरसेवक या नात्याने प्राधिकरणाचे सदस्य होते. या काळात श्री. कदम यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला होता. हे प्राधिकरण त्यांच्या दुःखद निधनाने फार मोठी हानी झाल्याचे अभिलिखित करीत आहे.

"या ठरावाची प्रत दिवंगत श्री.कदम यांचे कुटुंबियांकडे पाठवून त्यांच्या दुःखात प्राधिकरण सहभागी आहे असे कळवावे."

**********

**जोडपत्र-२**

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १३२वी बैठक

## दिनांक : २३ मार्च, २०१३

## : ठराव :

"श्री. राहुल अस्थाना, माजी महानगर आयुक्त हे दिनांक १० मार्च, २०११ ते दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३ या कालावधीत प्राधिकरणाचे सदस्य-सचिव व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त होते. या काळात श्री. अस्थाना यांनी केलेल्या कार्याचा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण गौरवपूर्ण उल्लेख करीत आहे. श्री. अस्थाना यांना त्यांचा भावी सेवाकाळ उज्वलशील जावो अशी सदिच्छा हे प्राधिकरण व्यक्त करीत आहे."

**********

**जोडपत्र-३**

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) (दुरुस्ती) विनियम, २०१३

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५० व उक्त अधिनियमाच्या कलम ४ चे उप-कलम (५) खालील प्रयोज्य शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सक्षम बनविणा-या इतर सर्व शक्तींचा वापर करुन हे प्राधिकरण राज्य शासनाच्या पूर्व संमतीने पुढील विनियम तयार करीत आहे. ते असे :-

(१) (१) या विनियमांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांस भत्ते) (दुरुस्ती) विनियम, २०१३ असे संबोधण्यात यावे.

(२) ही दुरुस्ती दिनांक १३ मार्च, २०१२ पासून अंमलात आली असे समजण्यात येईल.

(२) नियम ३ (१) मध्ये रु. '३००' ऐवजी रु. '५००' असे संख्यांतर करण्यात यावे.

(३) 'नियम क्र. (४) मध्ये' शेवटी "तसेच प्राधिकरण ठरविल व शासन मान्य करेल त्या रक्कमेने अशासकीय स्थायी निमंत्रिताना बैठक शुल्क सुध्दा मिळेल."

**जोडपत्र-४**

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम, १९७५

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ५० व त्यासोबत या अधिनियमाचे कलम ११ चे उपकलम (२) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन हे प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) विनियम, १९७५ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :-

(१) या विनियमांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती) (सुधारणा) विनियम, २०१३ असे म्हणावे.

(२) सदर सुधारीत विनियम १ एप्रिल, २०१३ पासून अंमलात येईल आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील सर्व अधिकारी/कर्मचा-यांना लागू होईल.

(३) सदर विनियमातील सुधारीत नियम क्र.(४) पुढीलप्रमाणे असेल :-

"प्रत्येकवर्षी वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती रक्कम ही एक महिन्याच्या वित्तलब्धी ऐवढी असेल. या कारणासाठी मासिक वित्तलब्धीसाठी मुळ वेतन, विशेष वेतन, प्रतिनियुक्ती कर्मचा-यांचा प्रतिनियुक्तीभत्ता, महागाई भत्ता, घरभाडे भत्ता, शहरभत्ता व स्थानिक पुरकभत्ता यांचा समावेश असेल. एक महिन्याच्या वित्तलब्धीएवढी अनुज्ञेय रक्कमेपेक्षा जास्तीची रक्कम प्रत्येक प्रकरणातील गुणवत्तेनुसार सक्षम अधिकारी यांना असलेल्या विशेष अधिकाराचा वापर करुन अतिरिक्त रक्कम विशेष बाब म्हणून मंजूर करु शकतील."

—— **** ——